आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२ सप्टेंबर २०२५ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- सेमीकंडक्टर उत्पादनात स्वावलंबी होण्याच्या दिशेनं भारताची वाटचाल सुरू असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- जीएसटी परिषदेची उद्यापासून नवी दिल्लीत बैठक, १२ आणि २८ टक्क्यांचा टप्पा हटवण्याचा निर्णय होण्याची शक्यता

- मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याकरता हैदराबाद गॅझेटियरच्या अंमलबजावणीसंदर्भात शासन निर्णय जारी, उपोषण सोडत आंदोलन मागं घेतल्याची मनोज जरांगे यांची घोषणा

आणि

- अफगाणिस्तानातल्या भूकंपबळींची संख्या एक हजार चारशेवर

**<><><><>**

भारत एक बळकट सेमीकंडक्टर परिसंस्था निर्माण करत असून त्यामुळं देश जागतिक स्तरावर स्पर्धात्मक आणि स्वावलंबी होईल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीतल्या यशोभूमी इथं आज सेमिकॉन इंडिया २०२५चं उद्घाटन करतानान ते बोलत होते. सेमीकंडक्टर उद्योगाच्या विकासासाठी जग भारतावर विसंबून ठेवत असल्याचं ते म्हणाले. जागतिक चिप बाजारपेठेत भारताच्या वाढत्या प्रभावावर त्यांनी भर दिला. २१ व्या शतकात, या लहान चिप्समध्ये मोठी शक्ती असल्याचं ते म्हणाले.

**- होल्ड बाईट मोदी- -**

येत्या काही वर्षांत जागतिक सेमीकंडक्टर बाजारपेठ एक ट्रिलियन डॉलर्सचा टप्पा ओलांडण्याचा अंदाज आहे, आणि भारत त्यात महत्त्वाची भूमिका बजावेल, असं ते म्हणाले. २०२१ पासून मंजूर झालेल्या १० सेमीकंडक्टर प्रकल्पांमध्ये १८ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक केली जात असल्याचं त्यांनी सांगितलं. नोएडा आणि बेंगळुरूमधली डिझाइन केंद्रं जगातल्या काही सर्वात प्रगत चिप्स बनवण्यावर काम करत असल्याचं ते म्हणाले.

केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यावेळी उपस्थित होते. देशात पाच सेमिकंडक्टर युनिट्सचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. काही महिन्यांत आणखी दोन युनिट्द्वारे उत्पादन सुरू होईलं असं वैष्णव यांनी सांगितलं.

<><><>

जीएसटी, अर्थात वस्तू आणि सेवा कर परिषदेची ५६वी बैठक उद्या आणि परवा नवी दिल्लीत होणार आहे. करांचं सुसूत्रीकरण आणि कर विवरणपत्र भरण्याच्या प्रक्रियेचं सुलभीकरण, यासह नव्या जीएसटी सुधारणांबाबत या बैठकीत चर्चा अपेक्षित आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरुन याविषयी सुतोवाच केलं होतं.

जीएसटीचे फक्त ५ टक्के आणि १८ टक्के हे दोनच स्लॅब ठेऊन, १२ आणि २८ टक्क्याचे स्लॅब काढून टाकण्याचा निर्णय या बैठकीत होण्याची शक्यता आहे.

<><><>

मराठा आरक्षणासंदर्भात हैदराबाद गॅझिटियरची अंमलबजावणी करण्याचा शासन निर्णय राज्य सरकारनं आज जारी केला. त्यानंतर मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी उपोषण सोडलं, आणि गेले पाच दिवस मुंबईत सुरू असलेलं आंदोलन मागं घेत असल्याची घोषणा केली. मराठा आणि कुणबी एकच असल्याचा जीआर दोन महिन्यात काढण्यासाठी दोन महिन्याची मुदत सरकारनं मागितली आहे. मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांची आझाद मैदानावर भेट घेऊन त्यांना हैदराबाद गॅझिटियरबाबत शासनानं तयार केलेला मसुदा दाखवला. सातारा आणि औंध गॅझिटियरची अंमलबजावणी करण्याबाबत कायदेशीर बाबी तपासून लवकरात लवकर निर्णय घेतला जाईल असं त्यांनी सांगितलं. मराठा आंदोलकांवर दाखल गुन्हे मागे घेण्याची प्रक्रिया महिना अखेरपर्यंत पूर्ण केली जाईल, मुंबईत आंदोलकांच्या वाहनांवर लावलेला दंड मागे घेतला जाईल, आरक्षण आंदोलनात मरण पावलेल्यांच्या वारसांना सरकारी महाममंडळात नोकरी दिली जाईल, तसंच मृतांच्या वारसांना आर्थिक मदत दिली जाईल, असं आश्वासनही सरकारनं दिलं. जात प्रमाणपत्र पडताळणीची कार्यवाही अर्ज दाखल झाल्यापासून ३ महिन्यात पूर्ण करण्याचं आश्वासनही सरकारनं दिलं.

त्यानंतर आंदोलकांनी फटाक्यांची आतषबाजी करत आणि गुलाल उधळत जल्लोष केला.

**<><><><>**

हैदराबाद गॅझिटियरच्या अंमलबजावणीचा शासन आदेश सरकारनं आज जारी केला. त्यानुसार मराठा समाजातल्या नागरिकांना कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सोपी केली जाणार आहे. यासाठी गावपातळीवर समित्या गठीत केल्या जातील. कुणबी प्रमाणपत्र घेण्यासाठी इच्छुक असलेल्या मराठा समाजातल्या, जमिनीच्या मालकीचा पुरावा नसणाऱ्या व्यक्तिंना, प्रतिज्ञापत्र सादर करावं लागेल. १३ ऑक्टोबर १९६७ पूर्वी या भागात राहत असल्याचं प्रतिज्ञापत्रात नमूद करावं लागेल. त्या आधारे सक्षम अधिकारी स्थानिक चौकशी करुन खातरजमा करतील. त्यात प्रतिज्ञापत्र सादर करणाऱ्या व्यक्तीच्या नातेसंबंधातल्या कुणाला कुणबी प्रमाणपत्र मिळालं असेल तर आणि प्रतिज्ञापत्र सादर करणारी व्यक्ती ही प्रमाणपत्र मिळालेल्या व्यक्तीच्या कुळातली असल्याचं प्रतिज्ञापत्र, कुणबी प्रमाणपत्र मिळालेल्या व्यक्तीला द्यावं लागेल. या प्रमाणपत्राची तपासणी ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी आणि सहायक कृषी अधिकारी यांची समिती, वंशावळ समितीच्या सहाय्यानं करेल. त्यानंतर मराठा समाजातल्या व्यक्तींना कुणबी प्रमाणपत्र दिलं जाईल, असं या आदेशात म्हटलं आहे.

**<><><><>**

मुंबईच्या आझाद मैदानावर मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्यांना सरकारनं बळाचा वापर करून हटवायला हवं होतं, अस मत मुंबई उच्च न्यायालयानं आज व्यक्त केलं. या आंदोलनामुळे नागरिकांची गैरसोय होत असल्याबाबतच्या याचिकेवर प्रभारी मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती आरती साठे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. काहीजण पोलिसांचं ऐकत नसल्याचं महाधिवक्ता डॉ. बीरेंद्र सराफ यांनी न्यायालयाला सांगितलं. नियमांचं उल्लंघन केल्याप्रकरणी सरकारनं जरांगे यांना नोटिस बजावली असून त्यांनी सांगितल्यावरच लोक ऐकतील, असंही त्यांनी नमूद केलं. यावर, तुम्ही त्यांच्या लोकप्रियतेवर अवलंबून आहात का? तुम्ही आमच्या आदेशांचं पालन का करू शकत नाही? आंदोलकांची संख्या पाच हजारावरून एक लाखापेक्षा जास्त झाल्याचं तुम्ही कोर्टाच्या निदर्शनाला का आणून दिलं नाही? असे प्रश्न न्यायालयानं विचारले.

<><><><>

मराठा आरक्षण आंदोलकांच्या मागण्यांवर कायदेशीर निकषांवर टिकेल असा तोडगा काढण्यात यश आल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी समाधान व्यक्त केलं आहे. मंत्रीमंड़ळ उपसमितीच्या प्रयत्नांमुळं हे यश मिळाल्याचं ते म्हणाले. या आंदोलनामुळं मुंबईकरांना झालेल्या त्रासाबद्दल त्यांनी दिलगिरी व्यक्त केली.

- **- होल्ड मुख्यमंत्री बाइट - -**

- <><><><>

कापूस उत्पादक शेतकऱ्यांकडून किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत सुलभ खरेदीसाठी उपयुक्त ठरणारं कपास किसान ॲप्लिकेशन केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह यांनी आज लाँच केलं. या ॲप्लिकेशनच्या माध्यमातून नोंदणी, स्लॉटचं आरक्षण तसंच व्यवहारांची नोंद आणि पाठपुरावा करणं शेतकऱ्यांसाठी सोपं होणार आहे. या ॲप्लिकेशनमुळे खरेदी केंद्रांवरचा वेळ, कागदपत्रं तसंच अवैध विक्री यांपासून कापूस उत्पादक शेतकऱ्यांना संरक्षण मिळेल, असं सिंह यावेळी म्हणाले.

<><><><>

तेलंगणामध्ये आमदार के कविता यांना पक्षविरोधी कारवाया केल्याबद्दल पक्षातून निलंबित केलं आहे. बीआरएस अर्थात भारत राष्ट्र समितीचे अध्यक्ष के चंद्रशेखर राव यांनी त्यांची कन्या कविता हिला निलंबित करण्याचा निर्णय घेतला आहे. कालेश्वरम प्रकल्पाच्या सीबीआय चौकशीदरम्यान केसीआर यांची बदनामी करण्यासाठी चुलत भाऊ हरीश राव आणि संतोष कुमार यांनी मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांच्याशी संगनमत केल्याचा आरोप कविता यांनी केला होता. गेल्या वर्षी १०० कोटी रुपयांच्या दारू घोटाळ्यात अटक झालेल्या आणि जामिनावर सुटलेल्या कविता यांना अलीकडेच पक्षाशी संलग्न संघटनेतून काढून टाकण्यात आलं होतं. अलिकडच्या आठवड्यात त्या पक्ष नेतृत्वावर उघडपणे टीका करत होत्या.

<><><><>

सततच्या पावसानं पंजाबमधली पूरस्थिती अजूनही गंभीर आहे. भाक्रा धरणासह विविध धरणातून नियंत्रित स्वरुपात पाणी पुरवठा होत असल्यानं नदीपात्रात मोठ्या प्रमाणात पाणी आहे. राज्यातल्या १२ जिल्ह्यांना या पुराचा फटका बसला असून आतापर्यंत

२९ जणांचा मृत्यू झाला असून शेकडो एकर शेती पाण्याखाली गेली आहे. सतलज आणि रावी नदीच्या किनारी राहणाऱ्यांना नागरिकांनी मदत छावण्यांमध्ये दाखल व्हावं असं आवाहन राज्य सरकारनं केलं आहे.

**<><><><>**

अफगाणिस्तानात रविवारी झालेल्या  भूकंपात बळी गेलेल्यांचा आकडा १ हजार ४००च्या वर गेला आहे, तर हजारो जण जखमी झाले आहेत. ६ रिक्टर स्केल तीव्रतेच्या या भूकंपाचं केंद्र नंगरहार प्रांताची राजधानी जलालाबादपासून २७ किलोमीटर ईशान्येला, भूगर्भात ८ किलोमीटरवर होतं. या भूकंपात असंख्य घरं जमीनदोस्त झाली असून मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

**//<><><><>//**